# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

शिक्षणाचा अधिकार

सर्व शिक्षा अभियान

सारे शिकूया, पुढे जाऊया

क्र.126 शि.वि. / स.शि.अ. दिनांक : 18 / 07 / 2014

प्रति,

सर्व मुख्याध्यापक तथा सदस्य सचिव,
शाळा व्यवस्थापन समिती,
प्राथमिक. / उच्च प्राथमिक. / माध्य. शाळा,
म.न.पा. नागपूर.

**विषय :— सन 2014—15 मध्ये आपल्या शाळेत वयानुरूप समकक्ष वर्गात दाखल केलेल्या व 1 महिन्या पैक्षा अधिक काळ सतत गैरहजर असणा—या बालकांचे विशेष प्रशिक्षण वर्ग दि. 1 ऑगष्ट 2014 पासून सुरू करणेबाबत.**

RTE-2009 मधील तरतुदीनूसार "शाळेत न जाणारे बालक" याचा अर्थ 6 ते 14 वर्ष वयोगटातील कधीही शाळेत प्रवेश न घेतलेले बालक आणि शाळेत एका महिन्यापेक्षा अधिक काळा सातत्याने अनुपस्थित राहणारे बालक असा आहे.

RTE-2009 भाग दोन मधील कलम 4 च्या तरतुदीनूसार अशा सर्व बालकांना वयानुरूप समकक्ष वर्गामध्ये दाखल करून विशेष प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने शाळाबाहय बालकांना नियमित शाळेत त्यांच्या वयानुरूप वर्गात दाखल करणेबाबत आपणास वेळोवेळी सूचना व मार्गदर्शन करण्यात आले आहे.

विशेष प्रशिक्षण सुविधा देण्याबाबत पुढील प्रमाणे कार्यवाही कराव.

1. शाळाबाहय बालकांची जबाबदारी ही फक्त वयानुरूप समकक्ष वर्गात दाखल केलेल्या वर्गाच्या वर्ग शिक्षकाची नसून ती संपूर्ण शाळेची आहे. त्या दृष्टीने सर्व शाळेच्या मुख्याध्यापकांनी तथा सदस्य सचिव शाळा व्यवस्थापन समितीनी नियोजन करून शाळाबाहय बालकांना अध्ययन – अध्यापन करण्यासाठी विषय विभागणी करून सर्व शिक्षकांना जबाबदारी देण्यात यावी. यांचे संपूर्ण नियोजन करण्यात यावे व विशेष प्रशिक्षण देण्याचे दैनंदिन वेळापत्रक तयार करण्यात यावे.
2. नगपूर महानगरपालिकेच्या शाळा व शाळा व्यवस्थापन समिती यांनी शालेय परिसरातील शाळाबाहय मुलांचा नियमितपणे शोध घेण्यात यावा, शोध घेताना नजिकच्या क्षेत्राचा (1,3 व 5 किमी परिसराचा) विचार करावा. तसेच शाळेच्या दर्शनिभागात शाळा क्षेत्राचा नकाशा प्रदर्शित करावा.
3. शाळाबाहय बालकांच्या पालकांना भेटून, त्यांना शाळेत येण्यासाठी प्रवृत्त करावे व समकक्ष वर्गात प्रवेश देऊन आठवी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती सर्व उपाय योजना करावी.
4. शाळेनी आपल्या कार्यक्षेत्रातील 6 ते 14 वयोगटातील लोकसंख्या विचारात घेऊन एकही बालक शाळाबाहय राहणार नाही याची खातर जमा करावी. याकरीता वार्ड शैक्षणिक पंजिका (WER) सातत्याने अद्यावत ठेवावे. शालेय परिसरातील शाळेत

दाखल न झालेले बालक निदर्शनास आल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे प्रयोजन आहे. याची नोंद घ्यावी.

5. 6 ते 14 वर्ष वयोगटातील प्रत्येक शाळाबाहय बालकास मान्यता प्राप्त नियमित शाळेशिवाय इतर कोणत्याही पर्यायी शिक्षण केंद्रात प्रवेश देण्यात येवू नये.
6. 6 ते 14 वयोगटातील कधीही शाळेत दाखल न झालेल्या बालकांसाठी 6 महिन्याचे विशेष प्रशिक्षण वर्ग सुरू करावे.
7. 30 दिवस किंवा त्यापेक्षा जास्त दिवस शाळेमध्ये सतत गैरहजर असणा–या बालकांकरीता 3 महिन्यासाठी अनिवासी विशेष प्रशिक्षण अभ्यास वर्ग 1 ऑगष्ट 2014 पासून सुरू करावे.
8. शासनाचा अभ्यासक्रम अवलंबिणा–या मदरसा मक्ताब मध्ये शिकणा–या बालकांकरिता 6 महिन्याचे विशेष प्रशिक्षण अभ्यास वर्ग सुरू करावे.
9. विशेष प्रशिक्षणाचे आयोजन शाळा भरण्यापुर्वी 1 तास बालकाच्या सोयीनूसार शालेय आवारातच करण्यात यावे.
10. शाळाबाहय बालकांना विशेष प्रशिक्षण देण्याची संपूर्ण जबाबदारी ही, शाळा व शिक्षकांची असल्याचे याकामी बाहय स्वयंसेवकाची नियुक्ती करण्यात येवू नये. असा प्रकार आढळून आल्यास संबंधित शाळा व शिक्षकांवर नियमानूसार शिस्तभंगाची कारवाई करण्याचे प्रयोजन आहे.
11. शाळा विकास आराखडयानूसार (SDP) आपण जोडपत्र – 3 व 4 मध्ये दर्शविलेल्या मुलांचे विशेष प्रशिक्षण वर्ग 1 ऑगष्ट, 2014 पासून सुरू करण्यात यावे. प्रस्ताव तात्काळ शाळा व्यवस्थापन समितीची सभा घेवून मंजूरी प्राप्त करून घ्यावी. दि. 30 सप्टेबर 2013 रोजी सतत गैरहजर मुलांची सध्य स्थिती तात्काळ संबंधीत साधन व्यक्ती, शाळा निरिक्षक यांना देण्यात यावी.
12. विशेष प्रशिक्षणासाठी लाभार्थी बालकांची वर्ग निहाय यादी शाळेच्या दर्शनीय भागात शाळाबाहय बालकांच्या प्रकारानूसार प्रदर्शित करावी.
13. विशेष प्रशिक्षणासाठी मंजूर असलेल्या निधी साठी सादील खर्च, लेखन साहित्य, शालेय दफ्तर आणि अल्पोहार इत्यादी निधी वर्ग करण्यासाठी शाळेनी तात्काळ प्रस्ताव दि. 25/07/2014 पूर्वि सर्व शिक्षा अभियान कार्यालयास सादर करावा.
14. आवश्यक असणारे पुरक अध्ययन–अध्यापन साहित्य प्रशिक्षण वर्गामध्ये दिलेल्या मागदर्शक सुचना प्रमाणे स्वतः तयार करावे किंवा मागणी त्वरीत नोंदवावी.
15. प्रत्येक बालकांचे स्वतंत्र अभिलेख जतन करणे गरजेचे आहे. त्यासाठी बालक निहाय केसस्टडी स्वतंत्र फाईल तयार करण्यात यावी.
16. प्रत्येक शाळाबाहय बालकांची पायाभूत चाचणी दर 15 दिवसानी घेवून अध्ययनस्तर निश्चित करावा. त्याच्या अध्ययनात होणा–या प्रगतीच्या नोंदी वेळच्या वेळी तयार केलेल्या फाईल मध्ये घेण्यात व्याव्यात.
17. शाळाबाहय बालकांच्या क्षमतेनूसार आवश्यक असणारे पुरक साहित्य शिक्षकांनी कार्यरत साधन व्यक्तीच्या व बालकांचा सहभाग घेवून स्वतः तयार करावे.
18. विशेष प्रशिक्षणातील लाभार्थी बालकांना देण्यात येणा–या प्रशिक्षणा संदर्भात बालक व घटक निहाय नोंदी, सातत्यपूर्ण व सर्वकष मुल्यमापन तसेच स्वतंत्र हजेरी पत्रक वर्ग शिक्षकांनी अद्यावत ठेवणे बंधनकारक आहे.
19. बालकांच्या शैक्षणिक व मानसिक विकासाकडे शिक्षकांनी व्यक्तिशः लक्ष दयावे, विशेष प्रशिक्षण बालस्नेही, भयमुक्त व आनंददायी प्रत्येक बालकास अभिव्यक्तीची संधी देता येईल अशा वातावरणात घेण्यात यावे.

20. विशेष प्रशिक्षण वर्गास आठवडयातून 2 वेळा शाळा निरिक्षक, विषय साधन व्यक्ति, सहा. शिक्षणाधिकारी व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मधील अधिव्यख्यता हे भेटी देवून दर पधरवाडयाचा अहवाला मा. अपर आयुक्त यांना सादर करणार आहेत.

उपरोक्त सूचना प्रमाणे त्वरीत कार्यवाही होणे आवश्यक आहे. आपले विशेष प्रशिक्षणाचे प्रस्ताव त्वरीत सादर करावे.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका नागपूर

**प्रतिलिपी :– सविनय माहितीस्तव सादर**

1. मा. अपर आयुक्त, म.न.पा. नागपूर
2. मा. उपायुक्त, म.न.पा. नागपूर

**प्रतिलिपी :– पुढील कार्यवाहीस्तव सादर**

**उपरोक्त प्रमाणे शाळा व्यवस्थापन समिती यांना उचित मार्गदर्शन करण्यास्तव व अहवाल सशिअ. कार्यालयास सादर.**

3. सर्व शाळा निरीक्षक, म.न.पा. नागपूर
4. सर्व शहर साधन केंद्र समन्वयक, सशिअ. मनपा. नागपूर
5. सर्व समुह साधन समन्वयक, सशिअ. मनपा. नागपूर

२वा
शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका नागपूर